# योजनेसाठी कोण पात्र नाही

1) राज्यातील भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर व तत्सम जमाती व्यतिरिक्त इतर सर्व प्रवर्गातील सदस्य या योजनेमध्ये अर्ज करण्यास पात्र नाहीत.

2) मुंबई व मुंबई उपनगर या जिल्ह्यामधील व्यक्ती योजनेमध्ये अर्ज करण्यास पात्र नसेल.

3) १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्ष वयापेक्षा जास्त असलेले व्यक्ती योजनेमध्ये अर्ज करण्यास पात्र नाहीत.

4) एका कुटुंबातील एका पेक्षा जास्त व्यक्ती योजनेमध्ये अर्ज करण्यास पात्र नसेल.

5) अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवानिवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी या योजनेकरिता पात्र नाही.

6) ज्या लाभधारकांना किंवा कुटुंबातील व्यक्तीस या आधी “राजे यशवंतराव होळकर महामेष योजने” अंतर्गत लाभ मिळालेला आहे अशा लाभधारकांना “राजे यशवंतराव होळकर महामेष योजने” मध्ये पुन्हा अर्ज करता येणार नाही. तथापि इतर ३ योजनेकरिता अर्ज करण्यास पात्र असेल.

7) स्व:मालकीची किमान एक गुंठा जागा नसलेले व्यक्ती “राजे यशवंतराव होळकर महामेष योजने” मधील घटक क्रमांक १, ८, १० व १५ मध्ये अर्ज करण्यास पात्र नसेल.

8) स्वत:च्या २० पेक्षा कमी मेंढ्या असलेल्या कुटुंबातील सदस्यांना “मेंढ्याकरिता चराई अनुदान” या योजनेमध्ये लाभ घेता येणार नाही.

9) ज्या मेंढपाळ कुटुंबांच्या मालकी हक्काची महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही प्रकारची शेतजमिन आहे अशा मेंढपाळ कुटुंबातील कोणतेही सदस्य “शेळी-मेंढी पालानासाठी जागा खरेदी अनुदान” या योजनेचा अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**10)** राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायत व कटक मंडळामधील व्यक्तीस "कुक्कुट पक्षाच्या खरेदी व संगोपानाकरिता अनुदान" या योजनेमध्ये अर्ज करता येणार नाही.